एस.टी.
महाराष्ट्र राज्य परिवहन
मध्यवर्ती कार्यालय

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

कर्मचारीवर्ग खाते, डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई ४०० ००८.
(दूरध्वनी क्रमांक ०२२-२३०२३९०० फॅक्स क्रमांक ०२२-२३०८६३५२)

## अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी आरक्षित असलेल्या पदांसाठी जाहिरात

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या राज्यांतील सर्व विभागांत वर्ग-३ घटक संवर्ग पदांमध्ये सरळसेवा भरतीची प्रक्रिया विभाग स्तरावर सुरू आहे. त्याकरीता माहे नोव्हेंबर २००९ मध्ये विभाग स्तरावरील जिल्हा स्तरावर वृत्तपत्रांमध्ये विभाग नियंत्रकांमार्फत जाहिराती प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. त्या जाहिरातींमध्ये अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी दर्शविलेली पदे पुन्हा मध्यवर्ती कार्यालयामार्फत दिनांक ०५.१२.२००९ च्या वृत्तपत्रांमधून राज्य व प्रादेशिक स्तरावर जाहिरातीमधून प्रसिध्द करण्यात आली आहेत. सदर जाहिरातींमध्ये शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्रमांक रांक्रिधो. २००२/प्र.क.६८/क्रियुसे-२, दिनांक ३० एप्रिल, २००५ मधील तरतूदीनुसार खेळाडूंसाठी असलेल्या ५ टक्के समांतर आरक्षणाबाबत स्पष्टपणे वेगळे नमूद करण्यात आलेले नाही. म्हणून सदरची अतिरिक्त माहिती प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी, ज्या पात्र खेळाडू उमेदवारांनी पूर्वीच्या जाहिरातीस अनुसरून अर्ज केले असतील त्यांनी पुन्हा अर्ज सादर करावयाची आवश्यकता नाही. परंतु, ज्यांनी अर्ज केलेले नाहीत, अशांनी पुन्हा अर्ज सादर करावेत. सदरचे अर्ज दिनांक ३१.१२.२००९ पर्यंत दिनांक ०५.१२.२००९ रोजीच्या जाहिरातीत नमूद केलेल्या कार्यालयाच्या पत्त्यावर पोहोचतील, अशा बेताने पाठवावेत.

**सदर पदे, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक रांक्रिधो.२००२/प्र.क.६८/क्रियुसे-२, दिनांक ३० एप्रिल, २००५ मधील अटी व शर्तींच्या अधीन भरण्यात येतील. तरी, सदर शासन निर्णयातील अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेदवारांनीच अर्ज करावेत.**

प्रवर्ग व विभागनिहाय भरावयाच्या खेळाडूंसाठी राखीव असलेल्या पदांची संख्या खालील तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

| अ. क्र. | भरती व नेमणूकीचा विभाग | चालक (कनिष्ठ) | वाहक (कनिष्ठ) | सहाय्यक (कनिष्ठ) | अ. क्र. | भरती व नेमणूकीचा विभाग | चालक (कनिष्ठ) | वाहक (कनिष्ठ) | सहाय्यक (कनिष्ठ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई | १३ | १३ | ० | १६ | बीड | १२ | १० | ० |
| २ | पालघर | २० | १३ | १ | १७ | परभणी | ११ | ९ | ० |
| ३ | रायगड | १७ | १२ | २ | १८ | उस्मानाबाद | १२ | १४ | ० |
| ४ | रत्नागिरी | १८ | १२ | १ | १९ | औरंगाबाद | ५ | ६ | २ |
| ५ | सिंधुदुर्ग | १० | ८ | ० | २० | जालना | ९ | ७ | ० |
| ६ | ठाणे | २३ | २० | २ | २१ | नांदेड | १५ | १६ | ० |
| ७ | धुळे | १० | ९ | ० | २२ | लातूर | ११ | १५ | ० |
| ८ | अहमदनगर | ० | ३ | २ | २३ | अमरावती | १४ | १३ | ० |
| ९ | जळगांव | ५ | ६ | २ | २४ | बुलढाणा | १४ | १८ | ० |
| १० | नाशिक | २ | ० | ० | २५ | अकोला | ११ | १० | ० |
| ११ | पुणे | ३६ | १९ | ३ | २६ | यवतमाळ | १६ | १७ | ० |
| १२ | सांगली | २७ | २९ | ० | २७ | वर्धा | ५ | ६ | ० |
| १३ | सोलापूर | ७ | १८ | २ | २८ | भंडारा | ७ | १० | ० |
| १४ | सातारा | १६ | १४ | १ | २९ | चंद्रपूर | ९ | १४ | १ |
| १५ | कोल्हापूर | २६ | २१ | २ | ३० | नागपूर | ० | ३ | १ |

उमेदवारांची निवड प्रक्रिया, पदांसाठी विहीत केलेली वेतनश्रेणी/शैक्षणिक अर्हता/अनुभव/शारिरीक पात्रता/वयोमर्यादा इत्यादीचा तपशील, भरतीसंबंधी महत्वाची माहिती, उमेदवारांनी सादर करावयाचा अर्जाचा नमुना, चालक (कनिष्ठ) पदासाठी अनुभवाच्या दाखल्याचा नमुना, उमेदवारांसाठी महत्वाच्या सूचना, अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे, डिमांड ड्राफ्ट / इंडियन पोस्टल ऑर्डर बाबतच्या सूचना, इत्यादी विषयांची सर्व माहिती दिनांक ०५.१२.२००९ रोजी प्रसिध्द झालेल्या जाहिरातीत नमूद केलेली आहे. त्याचे काटेकोरपणे अवलोकन करून अर्ज पाठवावेत. सदर जाहिरात महामंडळाची वेबसाईट www.msrtc.gov.in वर उपलब्ध आहे.

खुल्या प्रवर्गातील उमेदवाराने रु. १००/- व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवाराने रु. ५०/- भरती प्रक्रिया शुल्काकरीता, डिमांड ड्राफ्ट अथवा इंडियन पोस्टल ऑर्डर अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

इमाव, भज-क व भज-ड आणि खुल्या गटांतील खेळाडू उमेदवारांनी, खेळाडूंसाठी असलेल्या ५ टक्के आरक्षणाचा लाभ, त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले वैध प्रमाणपत्र (Non Creamy Layer Certificate) सादर केले असेल तरच मिळू शकेल.

**महाव्यवस्थापक (क. व औ.सं.)**